स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

ईमेल - nandedrdc@gmail.com
दुरध्वनी क्र.- ०२४६२ - २३५०७७

क्र. २०२४/मशाका१/आस्था-२/सिआर-
दिनांक - ०६/१०/२०२४

## परिपत्रक

**विषयः- महसुल विभागातील गट-क संवर्गातील तलाठी पदभरती -२०२३ साठी पेसा अंतर्गत गुणवत्तेनुसार तयार करण्यात आलेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्दीबाबत**

तलाठी पदभरती-२०२३ करीता जिल्हाधिकारी, नांदेड यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदाची जाहिरात जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयामार्फत जाहिरात क्र.तलाठी भरती/प्र.क्र.४५/२०२३ दिनांक २६.०६.२०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार नांदेड जिल्हयात दि. १७.०८.२०२३ ते १४.०९.२०२३ या कालावधीत TCS कंपनी मार्फत सदर पदासाठी परिक्षा घेण्यात आलेली आहे.

शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी २०२३/प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि.०५/१०/२०२४ अन्वये अधिसूचना दिनांक २९.०८.२०१९ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेच्या पदांबाबत विविध विभागांमार्फत भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेनुसार अधिसूचित १७ संवर्गातील पदांसाठी देण्यात आलेल्या जाहिरातींमध्ये पेसा क्षेत्रातील ६९३१ रिक्त पदांचा समावेश होता. सदर जाहिरातीनुसार सुरू झालेल्या भरती प्रक्रिया उमेदवार निवडीच्या अंतिम टप्प्यापर्यत येऊन पोहोचल्या होत्या. काही विभागांनी निवड प्रक्रियेचा अंतिम निकाल जाहिर केला होता, तर काही विभागांमार्फत निवडप्रक्रियेचा निकाल तयार झाला होता, परंतु जाहिर झाला नव्हता. सदर अधिसूचना मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झाल्यामुळे ही भरती प्रक्रिया ज्या टप्प्यावर आहे त्याच टप्प्यावर थांबविण्याच्या सूचना शासनाच्या आदेशान्वये देण्यात आल्यामुळे ही भरती प्रक्रिया थांबविण्यात आली होती. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी २०२३/प्र.क्र.५४/आरक्षण ५ दि.०५/१०/२०२४ मधील निर्देशानुसार पेसा अंतर्गत रिक्त पदे निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना मानधन तत्वावर नियुक्ती देण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील महसुल विभागातील गट-क संवर्गातील तलाठी पदभरती -२०२३ पेसा अंतर्गत गुणवत्तेनुसार तयार करण्यात आलेली उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी या जिल्हयाचे संकेतस्थळ www.nanded.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत आहे. निवड व प्रतिक्षा यादीतील कागदपत्र तपासणी साठी तयार केलेली यादी ही तात्पुरती व प्राथमीक स्वरुपातील आहे. सदरची यादी ही उमेदवारांनी mahabhumi.gov.in पोर्टलवर भरलेल्या माहितीच्या आधारावर आधारीत आहे. त्यामुळे कागदपत्र पडताळणी नंतर त्यात बदल होऊ शकेल, सदर यादीवर काही आक्षेप असल्यास ते दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सांयकाळी ५.०० पर्यंत nandedrdc@gmail.com या मेलवर किंवा प्रत्यक्ष या कार्यालयात उपस्थित राहुन दाखल करावेत. त्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

करिता या परिपत्रकाव्दारे नांदेड जिल्ह्यातील तलाठी भरती-२०२३ मधील पेसा अंतर्गत निवड व प्रतिक्षा यादी या जिल्हयाचे संकेतस्थळ www.nanded.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

(सोबत-निवड व प्रतिक्षा यादी)

(अभिजीत राऊत, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, नांदेड

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

## पेसा क्षेत्रांतर्गत कंत्राटी तत्वावर तलाठी पदभरती 2023

सामाजिक प्रवर्ग- अनुसूचीत जाती (पेसा) | भरावयाची पदे-11

### निवडसूची

| अ.क्र. | परीक्षा नोंदणी क्रमांक | उमेदवाराचे नाव | जन्म दिनांक | मुळ प्रवर्ग | समांतर आरक्षण | सामान्यकृत गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1130856700420 | ONKAR PRAVESH DHANVE | 23/Oct/1999 | Schedule Tribe | PESA GEN | 177.02492 |
| 2 | 3260463100015 | ABHIJIT VITHOBA KUDMATE | 21/May/2000 | Schedule Tribe | PESA GEN | 171.98772 |
| 3 | 2050855400351 | SUMEET BHAGWAN NAITAM | 20/Nov/1996 | Schedule Tribe | PESA GEN | 170.89552 |
| 4 | 2080799800199 | RANJANA SHESHERAO DOKALE | 17/Jan/1996 | Schedule Tribe | PESA LDS | 167.82170 |
| 5 | 1293547100097 | JOTSANA YADAV ARKE | 08/Jan/1997 | Schedule Tribe | PESA LDS | 166.72603 |
| 6 | 3131135400438 | KIRTI SUBHASH BHISE | 05/May/1992 | Schedule Tribe | PESA LDS | 162.15776 |
| 7 | 1180799800365 | SUJATA SHANKAR GAWALE | 02/Jan/2000 | Schedule Tribe | PESA PA | 131.44650 |
| 8 | 3292680000063 | ASHA NAMDEV MAHURE | 13/Apr/1991 | Schedule Tribe | PESA SP | 127.41200 |
| 9 | 1133390700053 | PRALHAD KISHANRAO TILEWAD | 29/Jan/1975 | Schedule Tribe | PESA PT | 102.46718 |
| 10 | माजी सैनीक या समांतर आरक्षणांतर्गत पात्र उमेदवार उपलब्ध नाही. | | | | | |

### प्रतिक्षा यादी

| अ.क्र. | परीक्षा नोंदणी क्रमांक | उमेदवाराचे नाव | जन्म दिनांक | मुळ प्रवर्ग | समांतर आरक्षण | सामान्यकृत गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2280856700354 | VINOD UKANDRAO MALZARKAR | 02/Sep/1996 | Schedule Tribe | WL -PESA GEN | 170.74402 |
| 2 | 3130856700187 | SONBA BHAGWAN WAGHMARE | 10/Oct/1997 | Schedule Tribe | WL -PESA GEN | 166.97882 |
| 3 | 2192501900264 | GAJANAN RAM JEWLEWAD | 10/Mar/1996 | Schedule Tribe | WL -PESA GEN | 166.14394 |
| 4 | 1061662600014 | VAISHNAVI VYANKAT KALAWAR | 18/Oct/2001 | Schedule Tribe | WL -PESA LDS | 160.39747 |
| 5 | 2220799800402 | MAMTA KISAN JUMDE | 09/Jan/2003 | Schedule Tribe | WL -PESA LDS | 157.90914 |
| 6 | 2222885400182 | SWATI BABANRAO GUVHADE | 05/Apr/1994 | Schedule Tribe | WL -PESA LDS | 153.84728 |
| 7 | 3313564900040 | NIKITA ARJUN PHOLE | 19/Sep/2001 | Schedule Tribe | WL -PESA SP | 118.20718 |
| 8 | 3053069800126 | RITESH VASANTRAO KANAKE | 15/Nov/1990 | Schedule Tribe | WL -PESA PA | 114.34558 |
| 9 | 3310855400705 | AKSHAY SUDARSHAN MESHRAM | 23/Sep/1998 | Schedule Tribe | WL -PESA SP | 112.17545 |
| 10 | 3270008500122 | SANTOSH RAMKISHAN TARPE | 27/May/1995 | Schedule Tribe | WL -PESA PA | 110.93332 |

टिप:-

1. वरील निवडयादीमध्ये नाव समाविष्ट केले म्हणजे त्या उमेदवारास नियुक्ती दिली असा अर्थ होत नाही.
2. उमेदवाराची अंतिम नियुक्ती ही संबंधित उमेदवाराची ओळख/कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी, वैद्यकीय तपासणी अहवाल,चारित्र्य पडताळणी अहवाल त्याचप्रमाणे समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने व पेसा क्षेत्रातील नियुक्तीच्या अनुषंगाने सादर प्रमाणपत्रांची सक्षम प्राधिकारी यांचेकडून पडताळणी केल्यानंतरच करण्यात येईल
3. उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास व समांतर आरक्षणा अंतर्गत उमेदवार अपात्र ठरल्यास शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड